पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०४३ दि. २०/०९/२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

महिला पोलीसांनी केलेल्या तात्काळ मदतीमुळे महीलेचा मोबाईल परत मिळाला.

---

दिनांक १९/०९/२०१९ रोजी श्रीमती ढवळे, पोहवा ७९०७ व श्रीमती क्षीरसागर पोना ६०९६ यांना प्रभात पोलीस चौकीस दिवसपाळी ड्युटी असतांना श्रीमती स्नेहल विलास ढोरे वय १९ वर्षे धंदा- शिक्षण रा. अंबिका प्रसाद इन्कमटॅक्स लेन प्रभात रोड डेक्कन पुणे यांनी आज दिनांक १९/०९/२०१९ रोजी सकाळी १०/०० वाजता डेक्कन पोलीस स्टेशन येथे येऊन त्यांचा मोबाईल रेडमी कंपनीचा मोबाईल त्याचा संपर्क रिक्षामध्ये विसरुन राहीला त्यावरती संपर्क केला असता त्यावर रिंग जात आहे परंतु कोणी उचलत नाही असे सांगितले. लागलीच श्रीमती ढवळे, यांनी त्यांचा मोबाईल वरुन सदर मोबाईल नंबर वर संपर्क केल्याने कॉलर आयडीला पोलीस नाव दिसल्याने रिक्षा चालकाने फोन कॉल स्विकारला त्यांना आम्ही डेक्कन पोलीस स्टेशन येथे सदर मोबाईल हँन्डसेट घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे रिक्षा चालक लालचंद्र आनंदप्रसाद साहु रा. संगमवाडी शिवाजीनगर पुणे यांनी सदरचा मोबाईल हजर केला. मोबाईल श्रीमती स्नेहल ढोरे यांचा असल्याची खात्री झाल्याने सदरचा मोबाईल त्यांना देण्यात आला. श्रीमती ढोरे यांना त्यांचा रिक्षात विसरलेला मोबाई परत मिळाल्याने त्यांनी श्रीमती ढवळे मपोहवा ७९०७ व श्रीमती क्षीरसागर मपोना ६०९६ यांचे आभार मानले आहेत.

